# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०१५
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**नियोजन मंत्री** : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-२०१५ सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक १६ मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र. १ व २)**

(१) **सर्वश्री सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, सरदार तारा सिंह, संजय केळकर, किसन कथोरे, जितेंद्र आव्हाड, गणपत गायकवाड, विजय वडेट्टीवार, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"तंत्रशिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अल्पावधीच्या अभ्यासक्रमाकरीता शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून या अभ्यासक्रमातील विशीष्ट विद्यार्थ्याकरीता शिष्यवृत्ती योजना लागु करण्यात येणे, सदर योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना परस्पर मिळावा म्हणून शासनातर्फे विद्यार्थ्याचे वैयक्तीक बँक खाते उघडुन त्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती ही त्या खात्यात सरळ जमा करण्याची व्यवस्था असणे, ही शिष्यवृत्ती योजना सामाजिक न्याय विभागाकडून व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रमाणपत्राच्या आधिन राहुन राबविण्यात येत असताना गडचिरोली व अन्य भागातील २०२ संस्थाचालकांनी समाजकल्याण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय यातील अधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन जवळपास ६० कोटी रुपयांचा अपहार करणे, याबाबत गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस अधिक्षक यांनी पुराव्यासह काही कर्मचारी व संस्थाचालकांवर गुन्हे नोंदवणे. उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री छगन भुजबळ**, **जितेंद्र आव्हाड, राधाकृष्ण विखे पाटील, विजय वडेट्टीवार, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी लागणाऱ्या औषधांचे दरकरार व खरेदी आरोग्य सेवा संचालनालयामार्फत करण्यात येत असल्यामुळे बहुतांश जीवनावश्यक व जीवरक्षक औषधांचा दरकरार केलेला नसल्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांमध्ये जीवनावश्यक व जीवनरक्षक औषधांची टंचाई असणे, प्रत्यक्षात या औषधांची खरेदी स्थानिक पातळीवर करण्यात येत असणे, आरोग्य सेवा संचालनालयामधील अंतिम करण्यात आलेल्या निविदेतील जास्तीत जास्त औषधे सेकंडरी व टर्शरी उपचारांमध्ये मोडणारी असणे, जीवनावश्यक औषधे उपलब्ध नसल्यामुळे शासकीय आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांसाठी सुरुवातीलाच जे उपलब्ध आहे ते हायर अँटीबायोटिक्स औषधे वापरली जात असल्यामुळे रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग रेझिस्टंट निर्माण होत असणे, जीवनावश्यक व जीवरक्षक औषधांचा तुटवडा असताना सुध्दा खोकला, प्रोटीन्स, विटामीन्स यासारख्या अनावश्यक औषधांचा मोठ्या प्रमाणात साठा उपलब्ध असणे, जीवनावश्यक औषधांच्या तुटवड्यामुळे सर्वसामान्य गरीब नागरीकांमध्ये शासनाबाबत पसरलेला असंतोष, त्यामुळे आरोग्य सेवा संचालनालयातील दरकरारांबाबत आढावा घेऊन औषधांची खरेदी व अनुदानाचा विनियोग योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(३) **प्रा.वर्षा गायकवाड, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्रात अनुसूचित जाती-जमाती आयोगाची स्थापना होऊनही अनुसूचित जाती-जमाती आयोगाचा कायदा व नियम बनविण्यास शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई, अनुसूचित जाती-जमाती आयोगाचा कायदा व नियम बनविण्याची आवश्यकता, यामुळे शासनाच्या उदासिनतेमुळे राज्यातील अनुसुचित जाती-जमाती आयोगाचे काम करण्यास येणाऱ्या अडचणी, तसेच आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे अनेक वर्षापासून रिक्त असणे, यामुळे आयोग असूनही या प्रवर्गातील लोकांना न्याय देण्याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**पाच : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस).**

(१) गृह विभाग.

(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

**( मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे )**

**[ चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०४.०० वाजता ]**

**सहा : शासकीय विधेयके :-**

**(अ) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आजमी, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१४ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आजमी, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०१५.

---

**(२)** (क) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र दिवाणी न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

सात : **सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, गणपतराव देशमुख, डॉ.पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, जयदत्त क्षीरसागर, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री अब्दुल सत्तार, अबू आजमी, अमीन पटेल, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अवये प्रस्ताव :-**

"गत काही महिन्यांमध्ये महाराष्ट्र राज्यात माहिती अधिकार व सामाजिक कार्यकर्त्यांवर सातत्याने होणारे हल्ले, हल्लेखोरांना पकडून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात पोलीस दल अपयशी ठरणे, कॉ.गोविंद पानसरे यांच्यासारख्या जेष्ठ विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्यांवर पत्नीसह कोल्हापूर येथे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी करण्यात आलेल्या हल्ल्यात कॉ.गोविंद पानसरे यांचा झालेला मृत्यु, सदर घटनेला २४

दिवसाचा कालावधी उलटूनही हल्लेखोरांना पकडण्यात पोलीस दलाला आलेले अपयश, शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर घाला घालण्याच्या मनोवृत्ती वाढीस लागून परिणामी महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याची मलिन झालेली प्रतिमा, तद्वतच लहान बालके, महिला, अल्पवयीन मुली तसेच अनुसूचित जातीवरील अत्याचारांमध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाढ, आबालवृध्द व व्यापाऱ्यांच्या दिवसाढवळ्या होत असलेल्या हत्या रोखण्यासाठी पोलीस हतबल ठरणे, वाळू माफियांकडून शासनाच्या अधिकाऱ्यांवर होत असलेले हल्ले, अशा घटनांमुळे जनमानसात शासनाबद्दल निर्माण झालेला प्रचंड क्षोभ, याबाबत शासनाने प्रतिबंधात्मक कारवाई करुन तसेच कॉ.गोविंद पानसरे यांच्या हल्लेखोरांना त्वरित अटक करण्याबाबत केलेली वा करावयाची कार्यवाही."

आठ : **श्री.जयकुमार रावल, डॉ.जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री राजेंद्र पाटणी, अजय चौधरी, बाळासाहेब सानप, सुनिल प्रभू, गुलाबराव पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री योगेश सागर, किर्तीकुमार भांगडीया, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. चैनसुख संचेती, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, समीर कुणावार, बाबुराव पाचर्णे, ॲड. संजय धोटे, सर्वश्री चंद्रदीप नरके, संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रकाश आबिटकर, किशोर पाटील, आर.टी. देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात मागील शासनाच्या कार्यकाळापासून राज्य वीज वितरण कंपनीकडील आरएपीडीआरपी, इन्फ्रा-१, इन्फ्रा-२ चे प्रस्ताव प्रलंबित असणे, राज्यातील कृषी पंपांची जोडणी दिर्घकाळ प्रलंबित असणे, राज्यात दिवसेंदिवस वाढत असलेले वीजेचे दर, राज्यात अनुसरण्यात आलेली सिंगल फेज योजना अपयशी ठरणे, राज्यात बहुतांश गावांत फिडर सेप्रेशन न होणे, बऱ्याच जिल्ह्यांत अघोषित भारनियमन होणे, सध्या कार्यरत असलेले ट्रान्सफार्मर नादुरुस्त स्थितीत असल्याने विद्यमान ६३ के.व्ही. च्या ट्रान्सफार्मरची क्षमता वाढ करुन १०० के.व्ही. चे ट्रान्सफार्मर बसविण्याची आवश्यकता, राज्यात गावोगावी पसरलेल्या विद्युत तारांची ठराविक मुदतीने तपासणी करण्यात न येणे, विद्युत देयके चुकीची येत असल्याबाबत बऱ्याच विद्युत ग्राहकांकडून तक्रारी असणे, वीजेची चोरी होण्याचे प्रकार सातत्याने आढळून येणे, राज्यात बंद पडलेले वीज प्रकल्प सुरु करण्याच्यादृष्टीने कार्यवाहीची आवश्यकता, राज्यात अपारंपारीक उर्जा धोरण राबविण्याची आवश्यकता, ग्राहकांना चांगल्या तऱ्हेची व समाधानकारक सेवा देण्याची आवश्यकता, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन जिल्हा व तालुका स्तरीय दक्षता व तक्रार निवारण समित्या स्थापन करण्याची आवश्यकता, सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे सुशिक्षित बेरोजगार अभियंता योजना राबविण्याची आवश्यकता, फिडरवर होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने फिडर व्यवस्थापन योजना राबविण्याची आवश्यकता, केंद्र शासनाकडून दिनदयाळ उपाध्याय व आयपीडीएस योजनेचा निधी राज्याकडे जास्तीत जास्त मिळविण्याची आवश्यकता, विशेषतः मुंबई शहराची लोकसंख्या विचारात घेता २००० मेगावॅटची अतिरिक्त ट्रान्समिशन योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, राज्यातील पावरलुम उद्योगाकरिता वेगळी वर्गवारी निर्माण करण्याची गरज, रेशीम उद्योग, मत्स्य उद्योग, पशुपालन या वर्गाला

वीज पुरवठा करताना उद्योग वर्गवारीत त्यांचा समावेश करणे, राज्यातील शाळा, रूग्णालये इत्यादींना विद्युत पुरवठा करण्याकरिता वेगळी वर्गवारी निर्माण करून त्यांना विशिष्ट दराने वीज पुरवठा करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना. "

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) श्री.विजय भांबळे, वि.स.स.**

**"जिंतूर (जि.परभणी) येथील श्रीमती बोर्डीकर कन्या विद्यालय ही शाळा नगरपरिषदेची तसेच शासनाची परवानगी न घेता अवैधरित्या बांधण्यात आल्याबाबत"** या विषयावरील श्री.विजय भांबळे व इतर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०६०६ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.छगन भुजबळ, वि.स.स.**

**"शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांमध्ये खेळाडूंना देण्यात येणाऱ्या आरक्षणात अपंग खेळाडूंचा समावेश करण्याची शिफारस"** या विषयावरील श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू व इतर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३६४८ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ मार्च, २०१५

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.